लोकमत

# समंजस नेतृत्वच येतेय संपुष्टात

## रवींद्र लाखे : कल्याणमध्ये युवा लेखक संमेलनाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कल्याण : राजकारणाकडे आता करिअर म्हणून पाहिले जात आहे. प्रत्येकालाच सत्तेचा हव्यास आहे. करिअरची तथाकथित गोष्ट जगाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरत आहे. सध्याच्या घडीला समंजस नेतृत्वच संपुष्टात आल्याची टीका ज्येष्ठ कवी, दिग्दर्शक रवींद्र लाखे यांनी केली आहे.

साहित्य अकादमीतर्फे येथील याज्ञवल्क्य सभागृहात शुक्रवारी युवा लेखक संमेलनाला सुरुवात झाली. या संमेलनाच्या उद्घाटनवेळी लाखे बोलत होते. राष्ट्रीय पुस्तक दिनानिमित्त हे तीनदिवसीय संमेलन भरवण्यात आले आहे. यावेळी साहित्य अकादमीचे कृष्णा किंबहुने, सुप्रसिद्ध लेखक व अनुवादक जयप्रकाश सावंत, याज्ञवल्क्य संस्था विश्वस्त राजीव जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

लाखे म्हणाले की, एखादा तरुण पूर्णपणे जाणकार होण्यापूर्वीच एका समूहाला जाऊन मिळतो. त्यामुळे समंजस नेतृत्वच उदयास येत नसल्यामुळे हे अनर्थाचे मूळ आहे. या तरुणांचे समूहाबाहेर स्वत:चे अस्तित्व नसल्याचे सांगत कुणाची पर्वा न करणाऱ्या या मानवाने असमंजसपणाचा अधिकार मिळवला आहे. समाज व सामाजिक व्यवस्थेवर बोलण्यापेक्षा काम करणे गरजेचे आहे. आपण काम केले तर समोरच्याला जागे करू शकतो. कवी, लेखक हे आत्मशोधनासाठी लिहीत असतात, हे समजून मी बोलत आहे. निरागस माणूसच जगाशी लढा देऊ शकतो. निसर्गाचे एक विज्ञान आहे. आपल्या आनंदासाठी विज्ञानाकडे दुर्लक्ष मानव करत असेल, तर त्याला निरागस म्हणता येईल का? कथा, कादंबरीमध्येही निरागसता हवी. युवा संमेलनाचा अध्यक्ष हा युवा असला पाहिजे, असेही ते म्हणाले.

### वाचन आवश्यक

आपण निरनिराळ्या समज-गैरसमजांत गुरफटलेले असतो. त्यातून मोकळे होण्यासाठी वाचन महत्त्वाचे आहे. लहानपणी वाळूचे कण रगडल्यास तेल कसे गळते, याचा अर्थ समजला नाही. मोठेपणी 'भर्तृहरीचे नीतिशतक' हे पुस्तक वाचनात आले. प्रयत्न करून असाध्यही साध्य करता येईल, पण मूर्खांना समजावणे कठीण असा त्याचा अर्थ आहे. पुस्तकांच्या वाचनानंतर आपले खरे काम सुरु होते, असे लाखे यांनी सांगितले.

सावंत म्हणाले की, मी वयाच्या पन्नासाव्या वर्षी लिखाणाला सुरुवात केली. त्यानंतर, गेली काही वर्षे मी पाश्चात्त्य पुस्तके, लेखक, प्रकाशक याविषयी लिहीत आहे. त्यामुळे युवा लेखकांच्या संमेलनाला मला बोलावण्यासाठी साहित्य अकादमीने कोणते निकष लावले, याची कल्पना नाही. कोणत्याही माणसाकडे धर्म, जात, प्रांत यापलीकडे पाहण्याची दृष्टी मला आईकडून मिळाली. कबिराने 'ढाई अक्षर प्रेम का' असे म्हटले आहे; पण आपण द्वेषाची अडीच अक्षरे जवळ केली आहेत. या बेचैनीतूनच २० वर्षांपूर्वी अनुवादाला सुरुवात केली. काही तरुण अनुवादक अतिशय मोलाचे कार्य करीत आहेत. त्यांचेही एक सत्र या मेळाव्यात असावे, असे त्यांनी यावेळी सुचवले.